**<u>ठळक बातम्या</u>**

- अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे बालविवाह रोखण्यासाठी राज्यभरात प्रशासन सज्ज

- वेव्हज अर्थात पहिल्या जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेला उद्यापासून मुंबईत सुरुवात, प्रधानमंत्री करणार उद्घाटन

- देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती

- मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर सेवानिवृत्त, देवेन भारती नवे पोलीस आयुक्त

**आणि**

- पश्चिम बंगालमधे हॉटेलला लागलेल्या आगीत १५ जणांचा तर आंध्र प्रदेशात झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू

**<><><><><>**

राज्यात अक्षय्य तृतीयेला अनेक ग्रामीण- दुर्गम भागात बालविवाह लावले जातात. हे विवाह रोखण्यासाठी विविध जिल्ह्यात मोहीम राबवण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्हा, तालुका आणि गावस्तरीय अधिकाऱ्यांना अशा कोणत्याही घटनांविरुद्ध सतर्क राहण्याचे आणि त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसंच, बालविवाह निर्मूलनासाठी जिल्हा कृती दल सक्रिय करण्यात आलं आहे.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे बाल विवाह रोखण्यासाठी **पालघर** जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांनी जिल्ह्यात बाल विवाह करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

**नाशिक** जिल्हा परिषदेच्या वतीने बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न सुरू असून यंदा एकही बालविवाह होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. त्यासाठी विशेष हेल्पलाईन सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड.. बाईट- आशिमा मित्तल**

**<><><><><>**

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेली अक्षय्य तृतीया आज साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळ्यांसाठी यश, वृद्धी आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महात्मा बसवेश्वर जयंती आज साजरी होत आहे. समाजाप्रति महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, प्रधानमंत्री मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

या शुभदिनी आपल्या जीवनात नवचैतन्य येवो, उत्तम आरोग्य, सुख-समृद्धीने संपूर्ण वर्ष जावो, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आपणा सर्वांच्या आयुष्यात अक्षय्य सुख-समृद्धी, धन संपदा नांदो अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर अक्षय्य तृतीयेच्या मंगलदिनी घरोघरी लक्ष्मीचा सदैव वास राहो, अक्षय्य सुख-समृद्धी, यश, ऐश्वर्य, शांती आणि उत्तम आरोग्य लाभो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत.

वीरशैव लिंगायत संप्रदायाचे संस्थापक, महान समाज सुधारक, विश्वगुरु महात्मा बसवेश्वर महाराज यांना जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अभिवादन केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरची मंत्रिमंडळाची ही पहिलीच बैठक आहे. मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठकही आज होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून महाराष्ट्र, केरळ आणि आंध्रप्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत उद्यापासून सुरू होणाऱ्या वेव्हज परिषदेचं उद्घाटन प्रधानमंत्री करतील. शुक्रवारी ते केरळला रवाना होणार असून तिथं विळिंजम आंतरराष्ट्रीय बंदराचं लोकार्पण करतील. त्यानंतर आंध्रप्रदेशातल्या अमरावती इथं प्रधानमंत्री ५८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. तसंच सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचंही उद्घाटन करणार आहेत.

**<><><><><>**

*पहिली जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषद उद्यापासून मुंबईतल्या जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटरमध्ये सुरू होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून मनोरंजन आणि दृक्श्राव्य उद्योगाच्या भविष्याला एक जागतिक व्यासपीठ मिळणार आहे. या परिषदेत मनोरंजन क्षेत्रातली आघाडीची व्यक्तिमत्त्वं, विविध माध्यम समूहांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी यांच्यासह जगभरातले सर्जनशील विचारसरणीचे आशय निर्माते सहभागी होणार आहेत. त्याशिवाय शंभर देशांमधले सुमारे ५ हजार प्रतिनिधी देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.*

**<><><><><>**

वेव्हज २०२५ या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणामुळे, रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारीत होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्रं आजपासून ४ मे पर्यंत रात्री

साडेआठ वाजता प्रसारीत होईल. बातमीपत्राच्या वेळेतला हा बदल ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीपुरताच आहे.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील महिन्याच्या १४ तारखेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

**<><><><>**

मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आज सेवानिवृत्त होत आहेत. फणसळकर यांनी ३० जून २०२२ रोजी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. ते भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ च्या तुकडीचे अधिकारी आहेत.

फणसळकर यांच्या जागी विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांची मुंबई पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागानं याबाबतचे आदेश जारी केले आहेत. ५३ वर्षांचे भारती १९९४ च्या तुकडीतले अधिकारी आहेत. देवेन भारती मूळचे बिहारचे असून त्यांनी झारखंडमधून मॅट्रिक तसंच दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवीचं शिक्षण घेतलं. अतिरिक्त पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त या पदावर त्यांनी काम केलं आहे. मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्याचा तपास करणाऱ्या दहशतवादी विरोधी पथकाचं त्यांनी नेतृत्व केलं होतं. देवेन भारती आज संध्याकाळी औपचारिक कार्यक्रमात फसणळकर यांच्याकडून पदाची सूत्रं स्वीकारतील.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधे मध्य कोलकाता इथं एका हॉटेलला  काल रात्री लागलेल्या आगीत १५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. आतापर्यंत १४ मृतदेह हॉटेलमधून बाहेर काढले असून आगीचं  कारण अद्याप कळलेलं  नाही.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार  रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे. या घटनेच्या चौकशीसाठी एक विशेष पथक तयार केलं आहे, अशी माहिती कोलकात्याचे पोलीस आयुक्त मनोज कुमार वर्मा यांनी दिली आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात विशाखापट्टणमजवळ सिंहाचलम मंदिरात आज सकाळी दर्शन रांगेजवळची भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले. मुसळधार पावसामुळे एक तंबू कोसळल्यानंतर ही भिंत कोसळली. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलाच्या बचाव पथकांनी  घटनास्थळी मदत कार्य सुरु केलं आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं  असून  आंध्र प्रदेशचे गृहमंत्री आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

**<><><><><>**

आयपीएल मध्ये, आज चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांचा सामना होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

काल रात्री, कोलकाता नाईट रायडर्सनं दिल्ली कॅपिटल्सचा १४ धावांनी पराभव केला. कोलकाता नाईट रायडर्सनं दिलेल्या २०५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दिल्ली कॅपिटल्सनं निर्धारित वीस षटकांत नऊ गडी गमावून १९० धावा केल्या.

**<><><><><>**

नाशिकमधल्या पिंपळगाव बसवंतमध्ये दोन बांगलादेशी नागरिकांना पिंपळगाव पोलिसांनी अटक केली आहे. हे दोन नागरिक जोपुळ रोड परिसरातील सोहन सिटीमध्ये अवैधरीत्या राहत होते. येत्या १ मे पर्यंत त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यात नांदखेडा इथं शस्त्र बाळगल्याप्रकरणी परभणी ग्रामीण पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी या दोघांकडून चार चाकी वाहनासह १० लाख ३७ हजार २००रुपयांचा मुद्देमाल, गावठी पिस्टल, तलवार आणि इतर शस्त्रं जप्त केली आहेत.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या सप्तश्रृंगीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांचं खासगी वाहन उलटल्यामुळं काल सकाळी झालेल्या अपघातात २६ भाविक जखमी झाले. जखमी भाविकांना वणी इथल्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

**//<><><><><>//**